# महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समिती

## वृत्तपत्र निवेदन

दिनांक - २७ जुलै २०२६

महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंता, अधिकारी कृती समितीने शासन आणि महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या कंपन्यांच्या प्रशासना विरोधात दि. ०५ ऑगस्ट २०२६ रोजी तिन्ही कंपन्यांच्या झोन कार्यालयासमोर दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत संघटनांचे प्रमुख पदाधिकारी व स्थानिक पदाधिकारी एक दिवसाचे उपोषण/अन्नत्याग आंदोलन करणार असल्याचे जाहीर केलेले आहे. तिन्ही कंपन्यातील कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन मागण्यांबाबत शासन व प्रशासनासोबत वारंवार पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच मा. मुख्य मंत्री व उर्जा मंत्री यांना वाटाघाटी करण्यासाठी वेळ देण्यात यावा अशी विनंती कृती समिती मार्फत अनेकवेळा करण्यात आलेली आहे. पण या बाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्याने कृती समितीला आंदोलनाची भूमिका घ्यावी लागत असल्याचे कृती समितीने स्पष्ट केले आहे. ज्या मागण्यांसंदर्भात कृती समितीला नाईलाजाने आंदोलन करावे लागत आहे त्यासंबंधित गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

१) **संभाव्य फ्रँचाईसी धोरण** - महावितरण कंपनीने संपूर्ण महाराष्ट्रातील कंपनीच्या मालकीच्या काही जिल्ह्यातील वीज वितरण व्यवस्था फ्रँचाईसी तत्वावर खाजगी कंपन्यांना देण्याचे ठरविले आहे. यापूर्वी सुध्दा महावितरण कंपनीने जळगांव, छ. संभाजी नगर , नागपूर , मालेगांव या ठिकाणी फ्रँचाईसी कंपन्याना दिलेले वीज वितरणाचे धोरण संपूर्ण पणे फसले असून महावितरण कंपनीला विनाकारण आर्थिक भुर्दंड सोसावा लागला असून त्याचा परिणाम थेट ग्राहकांवर झालेला आहे. फसलेले फ्रँचाईसी धोरण पुन्हा राबवून महावितरण कंपनीचे प्रशासन कंपनीला आणि ग्राहकांना आर्थिक संकटात लोटण्याच्या बेतात आहे. त्याला कर्मचारी, अभियंते व अधिकाऱ्यांच्या संघटनांचा तीव्र विरोध आहे. या घातक फ्रँचाईसी धोरणाचा पुन्हा अवलंब करण्यात येवू नये. वीज ग्राहकांच्या अर्थिक लुटी बरोबर हे धोरण म्हणजे वितरण कंपनीचे मागील दाराने खाजगीकरण आहे. म्हणून फ्रँचाईसी धोरण रद्द करण्यात यावे म्हणून हे आंदोलन आहे.

२) महाराष्ट्र शासनाने महावितरण कंपनीचे विभाजन करून कृषी ग्राहकांकरीता स्वतंत्र कृषी सोलर कंपनी स्थापन केली आहे. परंतु या बाबत अजून कोणतीच स्पष्टता नसून या नवीन कंपनीत कर्मचारी आकृतिबंध कसा राहील, कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती बाबतचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे महावितरण कंपनीच्या कर्मचारी, अभियंते, अधिकारी यांच्यात संभ्रमाचे आणि भीतीचे वातावरण आहे. त्यासाठी विभाजनानंतर महावितरण कंपनीच्या कर्मचारी, अभियंते, अधिकारी यांच्या सेवा शर्ती, सवलती कश्या राहणार याबाबत उभयपक्षी करार होणे आवश्यक आहे.

३) तिन्ही कंपन्या शेअर बाजारात सुचीबद्ध करुन IPO काढण्याच्या हालचाली वेगाने सुरु आहेत. महावितरण आणि महापारेषण कंपन्यांनी याबाबत आघाडी घेतली असून येत्या काही दिवसात या दोन कंपन्यांचे IPO बाजारात दाखल होतील. ही प्रक्रिया म्हणजे कंपन्यांच्या खाजगीकरण करण्याची सुरवात असल्याने यास कृती समितीचा विरोध असून ही प्रक्रिया ताबडतोब रद्द करून तिन्ही कंपन्या स्वबळावर उभ्या राहण्यासाठी शासनाने या कंपन्याना आर्थिक सहाय्य द्यावे अशी कृती समितीची मागणी आहे.

४) महानिर्मिती कंपनीचे नाशिक, भुसावळ, खापरखेडा व चंद्रपूर येथे असलेले ७ वीज निर्मिती संच बंद करण्यात येवू नयेत आणि त्याजागी नवीन तंत्रज्ञानावर आधारित वीज निर्मिती संच मंजूर करून कार्यान्वित करण्यात यावेत अशी कृती समितीची मागणी आहे. तसेच संपूर्ण वीज निर्मिती क्षेत्र शासकीय मालकीचे करण्यासाठी महानिर्मिती कंपनीच्या वीज निर्मिती क्षेत्रात भरीव वाढ करण्यात यावी.

५) एम ई आर सी ने आदेश पारित करून अदानी पॉवर कंपनीकडून १६०० MW वीज खरेदी करण्यास मंजुरी दिलेली आहे. याचा सरळ सरळ अर्थ आहे की महानिर्मिती कंपनीचे वीज निर्मिती संच बंद ठेवून अदानी पॉवर कंपनीकडून महागडी वीज विकत घ्यावी लागेल. यास कृती समितीचा विरोध असून मागणी आहे की एम ई आर सी ने जो आदेश अदानी पॉवरच्या बाजूने पारित केला आहे त्यास उच्च न्यायालयात आव्हान देण्यात यावे.

६) महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे कॅटॅगिरी-२ मध्ये येणारे जल विद्युत निर्मिती केंद्र खाजगी कंपन्यांना देण्याचे शासनाने ठरविलेले आहे. त्यास कृती समितीचा विरोध असून ही जल विद्युत निर्मिती केंद्र खाजगी कंपन्यांना देण्यात येवू नयेत आणि महानिर्मिती कंपनीकडे रहावीत यासाठी सामंजस्य करार करण्यात यावा अशी मागणी आहे. या अगोदर जल विद्युत निर्मिती केंद्र ही तत्कालीन म. रा. वि. मं. व नंतर महानिर्मिती कंपनीकडेच आहे. आणि ती अत्यंत सक्षमपणे चालविण्यात येत होती आणि आहेत. त्यामुळे यात खाजगी कंपनीची काहीही गरज नसतांना खाजगी कंपनीला ही निर्मिती केंद्र देण्याचा घाट घालण्यात येत आहे त्यास कृती समितीचा सक्त विरोध आहे.

७) तिन्ही कंपन्यातील कर्मचारी, अभियंता, अधिकारी यांचे विनाकारण थांबविलेले सानुग्रह अनुदान/ बोनस ताबडतोब जाहीर करण्यात यावे.

८) तिन्ही कंपन्यातील कर्मचारी, अभियंता, अधिकारी यांना मंजूर झालेली पेन्शन योजना त्वरित लागू करण्यात यावी. BR ६२४ प्रमाणे तत्कालीन म. रा. वि. मं. च्या प्रशासनाने १९९९ साली कर्मचारी, अभियंता, अधिकारी यांना महाराष्ट्र शासनाचे धर्तीवर पेन्शन योजना मंजूर केली होती. परंतु ही योजना अजून पर्यंत लागू करण्यात आलेली नसून त्याकरिता कोर्टबाजी चालू आहे. शासनाने व प्रशासनाने यात पुढाकार घेवून कोर्टबाजी त्वरित थांबवून पेन्शन योजना सर्वांना लागू करावी अशी आग्रही मागणी कृती समितीची आहे.

९) महावितरण कंपनहत पुर्नरचना कार्यक्रम लागू होण्या अगोदरच या कार्यक्रमात असलेल्या त्रुटी सर्व संघटनांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या आणि हा प्रशासनाचा एकतर्फी कार्यक्रम जश्याचा तसा राबविल्यास कंपनीचे महसुली नुकसान होण्याची शक्यता वर्तविली होती. पण त्याकडे दुर्लक्ष करून प्रशासनाने हेकेखोर वृत्तीने हा कार्यक्रम लागू केला आणि कंपनीचे आर्थिक नुकसान झाले. त्यामुळे महावितरण कंपनीत एकतर्फी रित्या लागू करण्यात आलेला सदोष पुर्नरचना कार्यक्रम रद्द करून सांघिक कार्यपद्धतीच्या यंत्रणेत सुधारणा करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

१०) पगारवाढ करार होवून जवळपास २ वर्ष उलटली आहेत. परंतु अद्यापही वेतनवाढीतील त्रुटी दूर करण्यात प्रशासनास यश आलेले नाही. या त्रुटी संदर्भात अॅनामली कमिटी तयार करण्यात आली परंतु या कमिटीच्या बैठका झालेल्या नसल्याने त्रुटी दूर झालेल्या नाहीत. अॅनामली कमिटीची बैठक घेवून वेतन वाढ मधील त्रुटी लवकर दूर करण्यात याव्यात अशी कृती समितीची मागणी आहे.

११) दि. ९ आक्टोबर २०२५ रोजी झालेल्या एक दिवसीय २४ तासाच्या संपासाठी दोन दिवसांची गैरहजेरी गृहीत धरून जो दोन दिवसांचा पगार कापण्यात आलेला आहे तो रद्द करून त्याचे किरकोळ रजेत रुपांतर करावे अशी कृती समितीची मागणी आहे. दि. ०९ आक्टोबर रोजी जो एक दिवसीय संप करावा लागला त्यास कृती समिती जबाबदार नसून प्रशासनाच्या हटवाढी भुमिकेमुळे हा एक दिवसीय संप संघटनावर लादण्यात आला. हे संघटनांनी मुख्यमंत्री महोदयांच्या नजरेत आणले आहे.

१२) कंपनी प्रशासनातर्फे या लादलेल्या संपाबाबत आकसपूर्ण दृष्टीकोन बाळगून कृती समितीच्या सभासदांवर दंडात्मक कार्यवाया तसेच न्यायालयीन प्रक्रिया सुरु करण्यात आलेल्या आहेत. हे सर्व प्रकार थांबवून रद्द करण्यात यावेत अशी कृती समितीची मागणी आहे.

१३) महावितरण कंपनीतर्फे नवनिर्मित ३३३ उपकेंद्राच्या संचलनासाठी BR २०३० नुसार ही उपकेंद्र बाह्यस्त्रोत यंत्र चालकांमार्फत म्हणजेच खाजगी एजन्सी मार्फत चालविण्यात येत आहेत. ही प्रथा अत्यंत गैर असून या द्वारे या कामगारांचे शोषण होणार आहे. तसेच उपकेंद्र चालविण्यासाठी प्रशिक्षित व अनुभवी यंत्र चालक असणे हे जरुरी आहे. त्यामुळे ही नवनिर्मित ३३३ उपकेंद्र बाह्यस्त्रोत यंत्र चालकांमार्फत चालविण्याचे रद्द करून येथे कायम स्वरूपी यंत्र चालकांची पदे निर्माण करण्यात यावीत आणि ती भरण्यात यावीत अशी कृती समितीची मागणी आहे.

१४) महापारेषण कंपनीत TBCB च्या माध्यमातून अति उच्च दाब वीज उपकेंद्र आणि उच्च दाब वीज वाहिन्या खाजगी कंपन्यांच्या घशात घालण्याचे षडयंत्र घाटात आहे आणि कंपनीच्या खाजगीकरणाचा डाव रचल्या जात आहे. याला कृती समितीचा तीव्र विरोध असून हे संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्यात यावी अशी कृती समितीची मागणी आहे.

१५) महापारेषण कंपनीमार्फत मंजूर करण्यात आलेल्या स्टाफ सेट अप मध्ये भरपूर प्रमाणात त्रुटी असून याबाबत या त्रुटी दूर करण्याबाबत प्रशासनाला अनेकवेळेला विनंती करण्यात आलेली आहे. परंतु अजूनही त्यास प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. या त्रुटी युक्त स्टाफ सेट अप मध्ये सुधारणा करण्यासाठी चर्चा करून त्यात सुधारणा करण्यात यावी अशी कृती समितीची मागणी आहे.

वर नमुद प्रश्नांच्या सोडवणुकीस्तव आणि वीज कर्मचारी, अभियंते, अधिकाऱ्यांच्या न्याय मागण्यास्तव कृती समितीला आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागला. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीला तिन्ही कंपन्याचे व्यवस्थापन जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

आपले विनीत

**महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समिती**

(कॉ. कृष्णा भोयर)
सरचिटणीस
महाराष्ट्र राज्य स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन

(श्री. अरुण पिवळ)
महामंत्री
महाराष्ट्र वीज कामगार महासंघ

(श्री. संतोष खुमकर)
सरचिटणीस
सबॉर्डीनेट इंजिनियर असोसिएशन (म.रा.वि.मं.)

(श्री. संजय मोरे)
सरचिटणीस
महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन

(श्री. दत्तात्रेय गुट्टे)
मुख्य महासचिव
महाराष्ट्र राज्य वीज कामगार कॉंग्रेस (इंटक)

(कॉ. राजेश कठाळे)
सरचिटणीस
महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी वर्कर्स युनियन

(प्रभाकर लहाने)
सरचिटणीस
तांत्रिक कामगार युनियन रजि. नं. ५०५९

(श्री. दामोदर चंगोले)
उपमुख्य महासचिव
म. रा. राष्टीय वीज कामगार फेडरेशन

(श्री. नवल दामले)
सरचिटणीस
ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असो.

(श्री. एम. एस. शरीकमसलत)
अध्यक्ष
राष्ट्रवादी वीज कामगार काँग्रेस

( श्री. नवनाथ पवार )
सरचिटणीस
म. रा. वि. ऑपरेटर संघटना

(श्री. व्ही. आर. जोनवाल)
अध्यक्ष
वीज निर्मिती कामगार संघटना

(श्री. विजय जाधव)
महासचिव,
फायनान्स ॲण्ड अकांउंट्स
एम्प्लॉईज युनियन

( श्री. ललित के. शेवाळे )
सरचिटणीस
क्रांतीकारी लाईनस्टाफ सेना

( श्री. दिपक बिडकर)
अध्यक्ष
म.रा.वि.मं. कार्यालयीन
अधिकारी/कर्मचारी संघटना

( श्री. स्वप्निल ठाकुर)
सचिव
युनियन ऑफ केमिस्ट